# आंदोलन फत्ते,अंदाजपत्रकानुसारच निविदा मंजूर होणार


दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com


सुविचार

''तुमच्या स्वप्नांवर विश्वास ठेवा, कारण त्यातच तुमचं यश लपलेलं आहे.''



जिल्हा युवा पुरस्काराचे वितरण-पेज ४


■ दैनिक ■धाराशिव ■वर्ष 2 रे ■अंक 84 ■रविवार दि.4 मे 2025 ■RNI NO-2023/90078 ■पाने 04 ■किंमत रू 5


# वाटाघाटी न झाल्यास फेरनिविदा काढा,सरकारचे निर्देश

## धाराशिव शहरातील १४० कोटींच्या रस्ते कामासंदर्भात नगर विकास विभागाचे पालिकेला पत्र

आरंभ मराठी | धाराशिव

ठेकेदाराच्या हट्टासाठी १५ टक्के वाढीव दराने रस्त्याच्या कामाची निविदा मंजूर करण्याचा घाट घालणाऱ्या पालिकेला सरकारने लगाम घातला आहे. ठेकेदारासोबत वाटाघाटी करून अंदाजपत्रकानुसारच निविदा मंजूर करा अन्यथा फेरनिविदा काढा, असे निर्देश नगर विकास विभागाच्या सहयुक्तांनी धाराशिव नगर पालिकेला दिले आहेत.दरम्यान, महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या उपोषणानंतर आणि पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या आदेशानुसार हे पत्र आले असून, यातून पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची विशेषतः ठाकरे गटाच्या स्थानिक नेत्यांवर मर्जी असल्याचे दिसून आले.

नगरोत्थान महाअभियान अंतर्गत धाराशिव नगरपालिकेला शहरातील रस्त्यांच्या कामांसाठी १४० कोटी (५९ डिपी रस्ते) रुपये खर्चाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी २३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्राप्त झाली आहे. महाविकास आघाडीने यासंदर्भात अनेकदा आंदोलन केले. तरीही दखल न घेतल्याने २८ मे रोजी शिवसेना (उबाठा गट) शहरप्रमुख सोमनाथ गुरव, युवा नेते रवी वाघमारे, सरफराज काझी यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दखल घेतली. त्यांच्या आश्वासनावर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. आंदोलनानंतर सरकारी यंत्रणा मात्र सजग झाली असून, तातडीने २ मे रोजी नगर परिषद संचालनालयाने मुख्याधिकारी यांना पत्र पाठवले आहे. यामध्ये ही कामे लवकर करण्याचे आदेश देण्यात आले असून, अंदाजपत्रकानुसार कामे पूर्ण करण्याचे सुचविण्यात आले आहे.१४० कोटीच्या निधीतून ५९ डीपी रस्त्याना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सात दिवसांच्या कालावधीत निविदा काढणे, तीन महिन्यांच्या कालावधीत कार्यारंभ आदेश देणे व प्रत्यक्षात कामे सुरू करणे बंधनकारक होते.मात्र एक वर्षाचा काळ जाऊनही याबाबत काहीच झाले नाही. यासाठी अनेकदा महाविकास आघाडीने व जनतेनेही आंदोलन केली. या प्रकल्पाची कार्यान्वित यंत्रणा नगरपरिषद असल्यामुळे त्यानी अनेकदा आश्वासने दिली,पण त्याची पूर्तता त्यांच्याकडुन झाली नाही. तेव्हा मात्र महाविकास आघाडीच्यावतीने आम्ही आमरण उपोषणास बसलो. अखेर तिसऱ्या दिवशी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी आंदोलनाची दखल घेतली व तातडीने हा प्रश्न निकाली काढू असे आश्वासन दिले. त्यांनी दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून हे आंदोलन आम्ही तात्पुरते स्थगित केले. मात्र दोनच दिवसात आंदोलनाचे फलीत समोर आले आहे. नगर परिषद संचालनालयाने मुख्याधिकारी यांना पत्र पाठवले आहे,असे सोमनाथ गुरव यांनी सांगितले.

## काय आहेत नगर विकास विभागाचे निर्देश?

नगर विकास विभागाचे सहआयुक्त संजय काकडे यांनी धाराशिव नगर पालिकेला दिलेल्या पत्रात म्हटले की, प्रशासकीय मंजूर कामे ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५ टक्के जास्त आहे.ही रक्कम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत कंत्राटदाराशी वाटाघाटी कराव्यात. त्यानी तयारी न दाखवल्यास फेरनिविदा मागवण्यात याव्यात. तसेच या कामासाठी स्वहिस्सा ठराव पाठवुन देण्याबाबतही आदेश दिले असल्याचे सोमनाथ गुरव यांनी सांगितले आहे.

## नागरिकांचे २२ कोटी वाचणार

नगरपालिकेचा लोकवाटा २५ टक्के अगोदरच आहे. त्याची रक्कम ३५ कोटी होती ही तरतूद करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५ टक्के अधिक आहे ती रक्कम २२ कोटीपर्यंत आतरिक्त भार नगरपालिकेवर पडणार होता. नगरपालिका म्हणजेच जनतेच्या खिशाला झळ बसणार होती. या निर्णयामुळे पालिकेचे व नागरिकांचे २२ कोटी रुपये वाचणार आहेत.



## उबाठा गटाशी पालकमंत्र्यांची जवळीक

फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाल्यापासून महायुतीमध्ये आलबेल नसल्याचे दिसून येत आहे. भूम-परांडाचे आमदार डॉ. तानाजी सावंत मंत्रिपद न मिळाल्याने नाराज आहेत. त्यांचा मंत्रिपदाचा वारू भाजपनेच रोखल्याचे सांगण्यात येत आहे. दुसरीकडे तुळजापुरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीच्या कामातील हेराफेरी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घातल्यानंतर या कामांना स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची नाराजी वाढली आहे.भाजपविरुद्ध शिवसेना असा सुप्त वाद सुरू असताना जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर पालकमंत्र्यांनी ठाकरे गटाचे खासदार ओमराजे आणि आमदार कैलास पाटील यांच्याशी जवळीक साधल्याचे दिसून आले. प्रशासकीय बैठकीत पालकमंत्री आणि ठाकरे गटाच्या लोकप्रतिनिधीमधील संवादातून हे स्पष्ट जाणवत होते. सत्ताधारी आणि विरोधक सातत्याने एकमेकांवर कुरघोडी करतात हा राजकारणाचा भाग आहे. मात्र, पालकमंत्र्यांनी महाविकास आघाडीच्या आंदोलनाला आवर्जून भेट देऊन रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसारच केले जाईल,असा शब्द देणे आणि त्यानुसारच शिवसेनेकडे असलेल्या नगर विकास खात्याकडून पालिकेला तातडीने पत्र काढायला भाग पाडणे,हेउल्लेखनीयआहे.

## ज्येष्ठ नागरिक मालमत्ता हक्क अभियान राबविण्यास सुरुवात

आरंभ मराठी | धाराशिव

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या परिपत्रकानुसार ''ज्येष्ठ नागरिक मालमत्ता हक्कांबाबत'' जिल्ह्यात विशेष अभियान राबविण्यात येत आहे. भारत सरकारच्या ''आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ '' व संबंधित २०१० मधील नियमांनुसार हा उपक्रम अमलात आणला जात आहे. या अधिनियमाचा मुख्य उद्देश म्हणजे ज्येष्ठ नागरिकांचे वृद्धापकाळात जीवन सुसह्य, सन्मानपूर्वक व तणावमुक्त व्हावे हा आहे. कलम २ (७) नुसार, ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या नातेवाइकांना (पाल्यांना) वारसा किंवा स्व-अर्जित मालमत्ता हस्तांतरित केली असल्यास, त्या पाळ्यांवर त्यांचे संगोपन करण्याचे दायित्व निश्चित केले गेले आहे. संगोपनास नकार देणाऱ्या पाल्यांविरोधात, कलम ५ नुसार, सक्षम प्राधिकाऱ्यांकडे तक्रार करता येईल. अशा प्रकरणांमध्ये कलम २३ अंतर्गत संबंधित मालमत्तेवर कारवाई होऊ शकते. या परिपत्रकाची वर्तमानपत्रे, सोशल मिडिया, तसेच गावांमध्ये दवंडी देऊन प्रभावी प्रसिद्धी करण्यात यावी, असे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी आदेशित केले आहे. नागरी क्षेत्रात मुख्याधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली व तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समित्या नेमण्यात याव्यात. या समित्यांनी वेळोवेळी आढावा बैठक घेत राहण्याचे निर्देश दिले आहेत.अभियान राबविताना कोणताही ज्येष्ठ नागरिक दुर्लक्षित राहू नये व त्यांचे हक्क अबाधित राहावेत, याची दक्षता घेण्यात यावी, असेही जिल्हाधिकारी पुजार यांनी स्पष्ट केले आहे.

## धाराशिवमध्ये ३२ बटूंवर उपनयन संस्कार




आरंभ मराठी | धाराशिव

येथील ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने यावर्षीही शुक्रवारी सामुदायीक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामध्ये २३ बटूवर उपनयन संस्कार करण्यात आले.ब्राह्मण कल्याण ट्रस्ट ही सामाजिक संघटना ७ वर्षापासून सामुदायीक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करत आहे. यावर्षी शुक्रवारी शहरातील पुष्पक मंगल कार्यालयात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १०.४४ वाजता शहरातील मान्यवर पुरोहित वर्गाच्या मंत्रोच्चारात धाराशिव जिल्ह्यासह परिसरातील २३ बटूवर उपनयन संस्कार करण्यात आले. ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने विविध समाजाभिमुख उपक्रम राबविले जातात. याचाच भाग म्हणून या सामुदायीक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.बटूंना आर्शिवाद देण्यासाठी माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, उर्मिला गजेंद्रगडकर, जेष्ठ नेते बाळासाहेब पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, श्री. सिध्दीविनायक परिवाराचे अध्यक्ष तथा भाजपा नेते दत्ताभाऊ कुलकर्णी, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे आदी उपस्थित होते. ब्राह्मण कल्याण ट्रस्ट ही सामाजिक संघटना ७ वर्षापासून सामुदायीक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करत आहे. मान्यवर पुरोहित वर्गाच्या मंत्रोच्चारात धाराशिव जिल्ह्यासह परिसरातील २३ बटूवर उपनयन संस्कार करण्यात आले. ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने विविध समाजाभिमुख उपक्रम राबविले जातात. याचाच भाग म्हणून या सामुदायीक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.

## वाळू चोरीवर कारवाई करण्यास गेलेल्या नायब तहसीलदारांवर दगडफेक

आरंभ मराठी | भूम

अवैध वाळूउपसा करून त्याची चोरी करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यास गेलेल्या नायब तहसीलदारांवर दगडफेक केल्याची घटना भूम तालुक्यातील साडेसांगवी शिवारात घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, भूम तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार प्रविण दिलीप जाधव १ मे रोजी मध्यरात्री एक वाजता पथकासह साडेसांगवी शिवारातील आण्णा मासाळ यांच्या घराजवळील बानगंगा नदी पात्रातुन अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्यास गेले होते. त्यावेळी नदीपात्रातील १,२०,००० रुपये किंमतीची २० ब्रास चोरी करणाऱ्या वाहनावर कारवाई करत असताना त्यांच्यावर जेसीबी चालक व टिप्पर चालकासह दहा व्यक्तींनी त्यांच्या पथकावर दगडफेक करुन शासकीय कामात अडथळा केला. याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

## जेवणासाठी थांबलेल्या व्यक्तीचे पैसे लुटले

तुळजापूर- धाब्यावर जेवण्यासाठी थांबलेल्या दोन व्यक्तींचे पैसे, मोबाईल आणि इतर साहित्य जबरदस्तीने लुटून नेल्याची घटना तुळजापूर सोलापूर रोडवरील पाहुणचार धाब्यावर घडली यासंबधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी महेबुब शब्बीर पटेल वय (३५ वर्षे, रा. मुळेगाव रोड सोलापूर) हे व त्यांचे काका दिनांक ३० एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता तुळजापूर सोलापूर रोडवरील पाहुनचार धाबा येथे जेवन करण्यासाठी थांबले होते. त्यावेळी आरोपी प्रशांत कांबळे, संभाजी पंलगे व इतर एका व्यक्तीने तेथे येवून फिर्यादी मेहबूब पटेल यांना पैशाची मागणी अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## समाजाभिमुख कार्याचा वसा, शिवसेना जिल्हाप्रमुख साळुंके यांच्याकडून कामगारांना संसारोपयोगी साहित्य

आरंभ मराठी | धाराशिव

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या शिवसेनेच्या ब्रीद वाक्याला अनुसरून कार्य करत शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने ५१ बांधकाम कामगारांना संसारोपयोगी साहित्य वाटप करून सामाजिक दायित्व दाखवून दिले.



धाराशिव हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना कायमच समाजकारण करत आलेली आहे. जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी त्यांच्या विचाराचा वारसा पुढ नेत आपल्या संपर्क कार्यालयात १ मे कामगार दिनाचे औचित्य साधून ढोकी व परिसरातील ५१ बांधकाम कामगारांना संसारोपयोगी भांडे व इतर साहित्य,शिष्यवृत्ती प्रमाणपत्र,मोफत आरोग्य तपासणी प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.यावेळी महिला आघाडी तालुकाप्रमुख मायाताई चव्हाण, ढोकी ग्रामपंचायत सदस्या विमल डोलारे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते व बांधकाम कामगार बंधू - भगिनी मोठ्या संख्येनेउपस्थितहोते.

## ..अखेर लाडक्या बहिणींच्या खात्यात दहाव्या हप्त्याचे वितरण सुरू

आरंभ मराठी | धाराशिव

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना ही गेल्या वर्षी सुरु झालेली आणि तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेची सुरुवात मध्य प्रदेश राज्य शासनाच्या धर्तीवर करण्यात आली. या अंतर्गत पात्र ठरणारे २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिलांना दरमहा पंधराशे रुपयांचा लाभ दिला जात आहे. याच योजनेचा एप्रिल महिन्यातील दहावा हप्ता कधी मिळणार याची प्रतीक्षा धाराशिव जिल्ह्यातील चार लाख लाडक्या बहिणींना होती. अखेर त्यांची प्रतीक्षा संपली असून दिनांक २ मे पासून यातील लाभार्थी महिलांच्या खात्यावर प्रत्येकी दीड हजार रुपयांचा दहावा हप्ता वितरित करण्यास सुरुवात झाली आहे. अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर मिळणारा हप्ता अखेर मिळण्यास सुरुवात झाली आहे. नवीन नियमानुसार पीएम किसान व नमो शेतकरी सन्मान निधीचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी महिलांना फक्त ५०० रुपये मिळणार आहेत.या योजनेंतर्गत आतापर्यंत महिलांना ९ हप्त्यांमध्ये एकूण १३ हजार ५०० रुपये मिळाले आहेत. धाराशिव जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेच्या ३ लाख ९० हजार लाभार्थी महिला असून, यापैकी जवळपास सर्व महिलांना शुक्रवारी आणि शनिवारी दहावा हप्ता वितरित करण्यात आला आहे.



# पतीवर्ता-मराठी भाषेचा वऱ्हाडी गोडवा

मराठी भाषेला अलिकडेच अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर केंद्रसरकारकडून अभिजात दर्जा बहाल करण्यात आला आहे.भाषेच्या प्राचीनतेवर यामुळे अधिकृत शिक्कामोर्तब झालेअसले तरी मायमराठी ही तिच्या अनेक बोलींमुळे खरेतर अधिक संपन्न आणि समृद्ध झालेली आहे.त्यामुळे आपली मातृभाषा अभिजात झाली म्हणून तिच्या बोलींना तर दूर लोटले जाणार नाही ना? अशी भीती अनेकांच्या मनात घोंगावत असेल कारण विशिष्ट पद्धतीनेच मराठी बोलणे,लिहिणे यासाठी साहित्यातील प्रस्थापित मंडळी कायम हट्टाग्रही राहिलेले आहेत,त्यांच्या हातातले साहित्यमंडळ,प्रकाशन संस्था आणि भाषावृद्धीसंबंधीचे अन्य घटक कठपुतळीच बनले आहेत.म्हणूनच अशा बोलीद्वेष्ट्या प्रवृत्तींकडून मराठीच्या बोलींना सापत्नभावाची वागणूक मिळत आली आहे. अर्थातच अशा विविध बोलींना म्हणजेच त्या बोलीमधून बोलणाऱ्या,साहित्य लिहिणाऱ्या साहित्यिकांशीही तशीच वागणूक होत आली आहे.परिणामी मराठी भाषेचेच आजवर नुकसान होत आलेले आहे.पण अशा सदाशिवपेठी अरेरावीला मुळीच न जुमानता बोलींमधून विपुल साहित्यलेखन करुन मायमराठीला अधिक सशक्त करणारे असंख्य साहित्यिक,कवी आणि लेखक महाराष्ट्राच्या विविध भागात आढळतील.त्यातीलच एक प्रतिभावंत साहित्यिक,कवी म्हणून विदर्भातले माननीय बापूराव झटाले यांचा उल्लेख करावा लागेल.त्यांनी वऱ्हाडी बोलीमधून लिहिलेल्या कविता आणि इतर लेखन



'बळीराजा तूच खास
अवतार बा ख्रिस्ताचा,

तुया खांद्यावर क्रूस
नीत असते कर्जाचा'

लोकप्रिय ठरले आहे.बोलीभाषेतल्या हजारो शब्दांनी मराठी भाषा आणखी सुंदर व सशक्त होताना दिसत आहे,त्यासाठी या लोकभाषेचा प्रवाह अडवू पाहणाऱ्या संकुचित वृत्तीच्या मूठभरांना बाजूला करायला हवे,तेव्हाच मायमराठीच्या बोलींचा सोहळा आभाळाला गवसणी घालू शकणार आहे.बापूरावांनी आपल्या साहित्यलेखनातून सामान्यांच्या अस्सल भावभावनांना चित्रित केले आहे.

कवी आणि परखड वक्ते म्हणून बोलबाला असलेल्या बापूराव झटाले आपल्या मुद्देसूद आणि अभ्यासपूर्ण मांडणीसाठी ओळखले जातात.प्रसिद्धीपासून जाणीवपूर्वक कोसो दूर राहिलेल्याझटाले यांनी २५-३० वर्षांपासून केलेल्या कवितालेखनाचे त्यांचे चिरंजीव,गांधीवादी लेखक,वक्ते चंद्रकात झटाले यांनी नुकतेच पुस्तक प्रकाशित केले आहे.'पतीवर्ता' या शीर्षकाने त्यांच्या कविता संकलीत होऊन वाचकांहाती पडल्या आहेत.बोली भाषेचा गोडवा अनुभवण्यासाठी हा संग्रह प्रत्येक मराठीप्रेमी वाचकाने वाचायला हवा.मराठीच्या विविध बोलींचे साहित्य मोठ्या प्रमाणात संपूर्ण मराठीजनांपर्यंत नीट पोहोचले आणि पोहोचवले गेले तर मायमराठीच्या भवितव्याची कुणालाही चिंता करण्याची मुळीच गरज भासणार नाही,तसेच त्याचे राजकारणही होणार नाही.या बोलींमुळे मराठीच्या सौंदर्यात भरच पडणार आहे. ग्रामीणजीवनात रुळलेल्या साधासुध्या शब्दांना कवितेत गुंफून ते रसिकांसमोर सादर करणाऱ्या कवी बापूराव झटाले यांच्या या कविता लोकांचे मनोरंजन करीत करीत प्रबोधन करणाऱ्या आहेत. त्यांच्या भावभावना चितारणाऱ्या आहेत. पतीपत्नी यांच्यामधलं प्रेमळ नातं असो किंवा लेकीसुनांचं कष्टमय जीवन असो ते आपल्या भाषेतून रसिक वाचकांपुढे ठेवणारे झटाले विलक्षण प्रतिभावंतच ठरतात.खेड्यापाड्यातील कष्टकरी जनताआणि त्यांच्या भावभावनांना आपल्या कवितांमधून शब्दरुप देऊन खरेतर त्यांनी अमर अक्षरशिल्पेच कोरलीआहेत. वऱ्हाडी बोली आणि मराठी साहित्याचे वैभव वाढविणाऱ्याच या कविता आहेत.ज्यातून माणुसकीचा झराझुळूझुळू वाहात असल्याची अनुभूती घेता येते.ग्रामीण जनतेला भलेही अडाणी,अशिक्षीत समजले जात असले तरी उपजत शहाणपणाच्या बळावर ती कधीही कुणावरही भारी पडत असते.शेकडो वर्षांच्या परंपरेने चालत आलेले मौखिक ज्ञान जतन करणाऱ्या लोकांनीच आपली संस्कृती जपण्याचे काम केले आहे.त्यातूनच ज्ञानाचा वारसा पुढील पिढ्यांच्या हाती सुपूर्द होत आला आहे.याचीच प्रचिती देणाऱ्या कविता या संग्रहाच्या पानोपानी आपल्याला आढळतील. त्यातून सत्य,न्याय या श्रेष्ठ मानवी मूल्यांची बूज राखणे असो,अन्यायाच्या विरुद्ध ठामपणे उभे राहाणे असो.साहित्याच्या माध्यमातून कवी,लेखक एकप्रकारे संस्कृतीजतन करण्याचेच काम करीत असतात.रात्रंदिवस राबणाऱ्या बळीराजाला म्हणजेच शेतकऱ्यांना 'ख्रिस्ताचा अवतार' संबोधून कवीने आपल्या प्रतिभेचा उत्तुंग अविष्कारच घडविला आहे. अशा चपखल शब्दात कष्टकरी वर्गाची वेदना मांडताना आणि त्याचे शोषण कसे होते हे स्पष्ट करताना कवी लिहितात,तुया अन्नानं रगत ज्याइच्या खेयते शरीरीतेच रक्त पेती तुवं अनं पाठोतात वरी' अर्थात जे तू पिकवलेले अन्न खातात तेच तुझा छळ करतात,तुला त्रास देतात,तुझे रक्त पितात! देशातल्या शेतकऱ्यांच्या बाबतीतली ही परिस्थिती अजूनही बदललेली नाही ही खरी आपली शोकांतिका आहे.जे तीस चाळीस वर्षांपूर्वी होते तेच आजही सुरु आहे.शेतकऱ्यांचे काबाडकष्ट काही कमी होताना दिसत नाही पण त्याचे शोषण मात्र अनेकपटीने वाढतच चाललेय. हीच काळीजवेदना 'ख्रिस्ताचा अवतार' या कवितेमधून आपल्यापुढे येते.ग्रामीण जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर पोटतिडकीने लिहिलेल्या अनेककविता या संग्रहात वाचता येतील.त्यातून कवी कसे ग्रामीण भावजीवनाशी एकरुप झाले आहेत याची साक्ष पटते.जे साहित्य सर्वसामान्य लोकांचे कष्टमय दुःख व्यक्त करते तेच खरे साहित्य होय,जे खऱ्या रसिकमनाला हेलावून टाकू शकते.हीच खरेतर अस्सल वाङ्मयाची व्याख्या असायला हवी.पण आजकाल समाजाच्या सर्वच क्षेत्रात खोटेपणाचीबजबजपुरी माजलेली दिसते.त्यामुळे असे अंतर्मनाला भिडणारे साहित्य दुर्मिळ झाले आहे. ग्रामीण जीवनाचे सरळसोपे वर्णन असो,लोकांचे प्रबोधन करणे असो अथवा समाजात देशभक्तीचे स्फुल्लिंग चेतवणे असो अशा अनेक विषयांवर बापूराव निष्ठेने व्यक्तझाले आहेत.कमीत कमी शब्दात मोठ्यात मोठा आशय व्यक्त करणेहे जसे आपल्या मौखिक परंपरेचे वैशिष्ठ्य तेच या कवितांचेही वैशिष्ठ्य आहे.' नातं या लहानशा कवितेतकवी लिहितात, 'भोरटल्या भळावर कव्वी येल बर्बटीची जशी आबाजीच्या खांद्यावर नात नवसाची' शेतारानातल्या साध्या प्रतिमा आणि त्याला भावनिक नात्याची डूब,यामुळे लोकांना कविता आपली न वाटली तरच नवल.थोर साहित्याचे हेच प्रमुख लक्षण असते जेलोकांच्या मनात ठाण मांडून बसते.याला या कविताही अपवाद नाहीत. पूर्णानदीच्या खोऱ्यात कवी झटाले यांचे बालपण गेले.एकाअर्थाने ते स्वतःला पूर्णामायचं लेकरुच मानतात.तिच्या परिसरातच कवीच्या प्रतिभेला बहर आला.निसर्ग हाच प्रतिभावंत साहित्यिकांची मूळ प्रेरणा राहिलेली आहे.माणूस हा निसर्गाचाच लहानसा घटक आहे.याचे तीव्र भान बाळगणारी कविता बापूरावांनी लिहिली आहे.प्रमाणभाषेचाआढ्यताखोर चष्मा दूर करुन तथाकथित भाषापंडितांनी निखळ साहित्यिक दृष्टीकोन स्विकारत बोलीभाषांचे,बोली साहित्याचे मोकळ्या मनाने स्वागत केले पाहिजे,तरच असे अज्ञात साहित्यमणी मराठीभाषेच्या मुकुटाची शोभा वाढवत राहातील.शेवटी त्यांची 'हे तिरंग्या!' या सद्यस्थितीवर टोकदार भाष्य करणाऱ्या कवितेतील या काही ओळी,



भरत यादव,
yadavbh515@gmail.com
९८९०१४०५००.




'हे तिरंग्या!

तुझा केशरी रंग त्याग,

हिरवा भरभराट

अन् पांढरा,शांतीचा निदर्शक आहे

पंचाऐंशी टक्के बहुजनांच्या त्यागावर

धरा टक्के बहुधन समाजाची हिरवी भरभराट

त्याग कुणाचा? भरभराट कुणाची?'

\- - - - - -

कवितासंग्रहाचे नावः पतीवर्ता
कवीः बापूराव झटाले
प्रकाशकः फ्रीडम पब्लिकेशन,अकोला
पृष्ठसंख्याः १२०
मूल्यः दोनशे रुपये.

# टोपी

हल्ली टोपी परिधान करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे.टोपी वापरणारी पिढी ही जवळजवळ इतिहास जमा होत चालली आहे.आता फक्त शुभकार्यप्रसंगी आवर्जून टोपी परिधान केली जाते .विवाह प्रसंगी विवाहाच्या अगोदरचा एक विधी म्हणजे ' टॉवेल टोपी ' चा कार्यक्रम होय.विवाहसंस्कारातील हा एक कार्यक्रमही अगदी महत्वपूर्ण असा कार्यक्रम असतो. कोणास कपड्यांचा आहेर करावयाचा असला तरी त्यात संपूर्ण कपड्यांसह टॉवेल -टोपीला आवर्जून स्थान असते.संपूर्ण कपड्यांचा आहेर जेव्हा केला जात नाही. तेंव्हाही ' टॉवेल -टोपीलाच ' किमान टॉवेल-टोपी तरी केले जाते.एकंदरीत आपल्या लोकजीवनात ' टोपी ' ला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते.टोपी हे सुसंस्काराचेही प्रतिक समजले जाते.राजकीय क्षेत्रातही एकेकाळी टोपीला महत्त्वाचे स्थान होते.मात्र आत्ता बदलत्या काळाबरोबर तेथूनही टोपीचे अस्तित्व नाहिसे होत चालले आहे. ' टोपी घालने किंवा टोप्या घालणे ' हा वाक्प्रचार मात्र तेवढासा चांगल्या अर्थाने वापरला जात नाही.दुसऱ्यांना फसविणे या अर्थाने तो वापरला जातो. गांधीटोपी,फरची टोपी, राजस्थानी टोपी,असे कांही ढोबळमानाने टोप्यांचे प्रकार पडतात.हॅट,कॅप हे सुद्धा टोपी या वर्गात मोडत असले तरी त्यांच्यात टोपीची जी एक प्रतिमा असते ती दिसत नाही.पुर्वीच्या काळी शिक्षक घालत असत ती टोपी,शेतात कष्ट करणारा शेतकरी वापरत असतो ती टोपी,वारकरी सांप्रदायात वापरली जाणारी टोपी. अशा टोप्या वापरणाऱ्यांकडे पाहिले की आदराने नतमस्तक व्हावे असे वाटते नाही का.राष्ट्रपिता महात्मा गांधीजीनी कधी टोपी परिधान केली नाही तरी त्यांच्या नावाने सामान्य माणूस वापरत असलेल्या टोपीला ' गांधी ' टोपी हे नामाभिधान प्राप्त झाले.एकंदरीत टोपी हे संस्कृतीचे,सभ्यतेचे ,सुसंस्काराचे , लोकजीवनाचे प्रतिक मानले जाते.असो,हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे माझे आदरणीय असलेले राज्य पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त मुख्याध्यापक कमलाकर भोसले गुरुजींनी एका कार्यक्रमात मला प्रेमपूर्वक घातलेली टोपी.



सुभाष रामलिंगप्पा वैरागकर
९४२३७६५०३१

# शून्यापासून सुरुवात

महापुरे झाडे जाती,
तेथे लव्हाळे वाचती ।

या तुकाराम महाराजांच्या ओळीचा अर्थ समजला म्हणजे जीवनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नेमकं काय करावं ते कळते. कोणत्याही गोष्टीची सुरुवात ही शून्यापासून म्हणजेच सूक्ष्मापासूनच होते. जसे फक्त परीक्षेच्या दिवशी वर्षभराचा अभ्यास करायचा म्हटला तर चांगले यश मिळणे शक्य नाही. चांगले यश मिळवायचे असेल तर रोज थोडा-थोडा अभ्यास करत राहिला पाहिजे त्यामुळे परीक्षेच्या दिवशी जास्त अभ्यास करायची गरज राहत नाही आणि परीक्षेचा ताणही येत नाही. यशही चांगले मिळते. माझ्या लक्षातच राहत नाही, आमची परिस्थिती नव्हती म्हणून आम्हाला नाही शिकता आले अशी लंगडी कारण सांगणाऱ्यांना मुळातच काही करण्याची इच्छा नसते. या सर्वांना मला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले हे सांगावेसे वाटते. या संदर्भात अजून एक वाक्य सांगावेसे वाटते ''शांततेच्या काळात जर जास्त घाम गाळला तर युद्धाच्या काळात कमी रक्त सांडावे लागते'' म्हणजेच आपल्या जीवनाची उद्दिष्टे साध्य करायची असतील तर आज हातात असलेला कोणताही वेळ वाया घालवू नये. मित्रांनो छत्रपती शिवबांनी सुद्धा आपल्या बाल सवंगड्यांसह रायरेश्वराच्या मंदिरात हिंदवी स्वराज्य निर्मितीचा संकल्प केला तेव्हाचे त्याचे क्षेत्र फार लहान होते. पण पुढील शंभर वर्षात त्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. शिवचरित्राचा अभ्यास केला तर आपल्या सहज लक्षात येतं की महाराजांवर केवढी मोठी संकटे आली, ती सर्व पार करत त्यांनी प्रचंड मोठे यश मिळवले त्या तुलनेने खरंतर आपल्यासमोर काहीच समस्या नसतात. तरी आपण अनेक लंगडी कारणे सांगण्यात आनंद मानतो. थोडक्यात काय तर 'नाचता येईना अंगण वाकडे' ही म्हण अशी माणसे सार्थ करून जातात. आज मोठमोठे उद्योग समूह किंवा उद्योजक हे एका दिवसात किंवा एका रात्रीत मोठे होत नाहीत, त्यांची सुरुवात अगदी लहान उद्योगा पासून झालेली दिसून येते. कधी कधी ती शून्यापासून झालेली असते. अशी अनेक उदाहरणे आपल्याला दिसतात की ज्यांनी सुरुवात लघुते पासून केली आणि आपल्याच आयुष्यात विश्वभरात आपला उद्योग पोहोचवण्यात ते यशस्वी झाले. जसे धीरूभाई अंबानी. थेंबे थेंबे तळे साचे या पद्धतीने आपण कोणतेही काम केले तर निश्चित चांगले यश मिळते हे सदैव लक्षात ठेवावे. काही व्यक्ती निवृत्तीनंतर किंवा वयाच्या साठी नंतर आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करण्यास सुरुवात करतात आणि पुढील पाच-दहा वर्षातच जगभर जाऊन पोचतात अशी अनेक उदाहरणे समाजात दिसतात. त्यामुळे आता वय झाले हो, आता नाही शक्य, कर्तबगारीचेही एक वय असते अशी कारण देणाऱ्यांनी वरील उदाहरण लक्षात




घ्यावे. एक दुसरे उदाहरण म्हणून सांगतो कधी कधी पायवाट म्हणून सुरू झालेला रस्ता भविष्यात महामार्ग होऊन जातो.यश किंवा अपयश मिळत असताना इतरांशी स्वतःची तुलना अजिबात करता कामा नये. तुलना करायचीच असेल तर ती केवळ स्वतःशी करायची म्हणजे मागच्या वेळी आपण केलेली कामगिरी आणि आताची कामगिरी यात किती प्रगती किंवा अधोगती झाली याचाच विचार करावा. दुसऱ्याशी तुलना केल्यास नैराश्य येण्याची दाट शक्यता असते. स्वतःशीच तुलना केल्यास उभारी येते. आधीच्या चुका पुन्हा होत नाहीत. योग्य दिशेने केलेला अभ्यास आणि त्याचा व्यासंग हा माणसाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जातो.

प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे
के. रा. कोतकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली
९९६७८१७८७६

# उष्णतेची लाट अन् पाण्याचा हाहाकार !

बदलते हवामान व उष्णतेची लाट यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी होत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाढत्या उष्णतामानामुळे राज्यातील जलसाठा आतापासूनच ३८ टक्क्यांवर येवून ठेपला आहे आणि पुढील दोन महिने अजून बाकी आहे. त्यामुळे जलसाठ्याची घसरगुंडी अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. कारण पुणे, विदर्भ, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मराठवाडा येथील संपूर्ण मोठ्या धरणांचा जलसाठा झपाट्याने खाली घसरत आहे. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील अनेक भागातील नागरिक सापडल्याचे दिसून येते.त्यामुळे आतापासूनच पाण्याचे गांभीर्य लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून योग्य वापर करण्याची गरज आहे. कारण राज्यातील जलसाठ्याची आकडेवारी पहाली तर अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे ती याप्रमाणे नागपूर ३९ .२७ टक्के, अमरावती ४८.९६ टक्के, पुणे ३२.७० टक्के, छत्रपती संभाजीनगर ३८.७७ टक्के, नाशिक ४२.६४ टक्के कोकण ४८.४१ अशाप्रकारे प्रमुख शहरातील जलसाठ्याची स्थिती आहे आणि दररोज झपाट्याने साठा कमी-कमी होत आहे यावर सरकारने ताबडतोब गांभीर्याने लक्ष केंद्रित करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील दोन महिन्यांत यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही.आज राज्यातच नाही भारतासह संपूर्ण जगात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे परिस्थितीनुसार पाण्याचा वापर होणे अत्यंत गरजेचे आहे.आज पाणी टंचाईची समस्या जगातील इतर अनेक ठिकाणांसारखीच थायलंडमध्येही आहे.मात्र त्यामुळे सण साजरा करण्याच्या उत्साहात अडचण येऊ नये म्हणून फॉगी स्प्रे,ईको-फ्रेंडली वॉटर गन्ससारख्या गोष्टींचा वापर केला जातो.म्हणजे सणाच्या निमित्ताने सुध्दा पाण्याची बचत केली जाते ही बाब थायलंड कृतीतून सिद्ध होते. त्यामुळे भारतात उन्हाळ्यातील पाण्याची गंभीर समस्या पहाता पाण्याचा एक-एक थेंब वाचविणे अत्यंत गरजेचे आहे.आज महाराष्ट्रासह भारतातील अनेक ग्रामीण भागात पाण्याची गंभीर समस्या आहे.कारण आजही ग्रामस्थांनांना पाण्यासाठी ३ ते ४ किलो मिटर अंतरापर्यंत वनवन हिंडावे लागते ही संपूर्ण परिस्थिती बदलते हवामान, जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वनवे लागने, ग्लोबल वॉर्मिंग,समुद्राची पातळी वाढने या संपूर्ण गोष्टींमुळे भुजल साठा दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो.आजही आपण पहातो की वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे म्हणजे पाणी समस्ये गंभीर रूप धारण केले असून पुढे चालून आक्राळविक्राळ रूप धारण करू शकते यालाही नाकारता येत नाही.कारण आजही राज्यासह देशातील अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेड झोनमध्ये



असल्याचे सांगितले जाते.कारण संपूर्ण सृष्टी, मनुष्य, संपूर्ण जीवजंतू पाण्याशिवाय जगूच शकत नाही त्यामुळे सरकारने पावसाळ्यात पाणी अडविण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे, पाणी जमीनीच्या पोटात गेले पाहिजे यासाठी युध्दपातळीवर वृक्षलागवड काळाची गरज आहे,औद्योगिकीकरणावर सरकारने लगाम कसली पाहिजे, वाढते शहरीकरण यावरही अंकुश लागायला हवा.कारण निसर्ग सुखरूप रहाला तर सर्वच काही ठीक राहील अन्यथा विनाशकारी प्रक्रिया दिवसेंदिवस वाढतच जाईल म्हणून पाण्याच्या बाबतीत सरकारने सावधगिरीने पाऊल उचलने गरजेचे आहे.वृक्षतोडीची झळ सर्वांनाच भोगावी लागते ही बाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कृतीतून सांगितली.नागपूर शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील अनेक भागांत नागपूर महानगरपालिकेव्दारे वृक्षतोड केली जात आहे.पण बदल्यात वृक्षारोपण मात्र शहराच्या बाहेर केले जात असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोंदविण्यात आले.शहरातील झाडे तोडली जात असल्यास शहराबाहेर वृक्षारोपण काय कामाचे, अशा शब्दात नागपूर खंडपीठाने महापालिकेला खडसावत क्रीडा संकुलासह इतर ठिकाणी प्रस्तावित वृक्षतोडीवर अंतरिम स्थगितीही दिली आहे.१ हजार ३७४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव असून या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे.या वृक्षतोडीच्या बदल्यात गोरेवाड्यात वृक्षारोपण करणार असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली.वृक्षतोड शहरात करायची आणि वृक्षारोपण शहराबाहेर करायचे, हे चालणार नाही असे न्यायालयाने मौखिकपणे नमूद केले. यावरून आपण समजू शकतो की वृक्षतोडीमुळे पाण्यासह जीवनाशी निगडित अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. शहरातील वृक्ष तोडायचे आणि शहराबाहेर वृक्षारोपण करायचे याला काय अर्थ?अशा शब्दातही उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिकेला खडसावले.यावरून लक्षात येते की शहरीकरणाच्या नावाखाली नागपूरसह राज्यातील अनेक भागांत वृक्षांची कत्तल सुरु आहे ही बाब सिद्ध होते आणि आज राज्यात किंवा देशात जी पाण्याची समस्या भेडसावत आहे व पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त वृक्षतोड व जंगलतोड होय.वृक्ष कटाई पाच मिनिटांत होते.परंतु एक वृक्ष लावून मोठे करायला पाच वर्षे लागतात याचे गांभीर्य सरकारने लक्षात ठेवून जलसंपदा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने सर्वच स्तरातून वृक्षलागवडीवर भर देण्याची गरज आहे.सरकारमार्फत जेवढी झाडे तोडायची असेल त्याच्या दुप्पट वृक्षलागवड सरकारने प्रथम करावी;नंतर वृक्ष तोडण्याचा निर्णय द्यावा.जय हिंद!



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# कामांची घिसडघाई; सुविधांचा पत्ता नाही, बस स्थानकात ना पाणी, ना स्वच्छतागृह

## तुळजापूर बसस्थानकाच्या उद्घाटनाचा घाट, आठ कोटींचा खर्च, कामे निकृष्ट

सुरज बागल | आरंभ मराठी

तुळजापूरः जवळपास आठ कोटी रुपये निधी खर्च करून बांधण्यात आलेल्या तुळजापूर येथील बस स्थानकाचे ३० एप्रिल रोजी परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. दरम्यान या बस स्थानकाच्या उद्घाटनाची घाई कशासाठी करण्यात आली हा प्रश्न निर्माण होत असून,बसस्थानकात अद्यापपर्यंत ना शौचालय सुरू आहे, ना पिण्याच्या पाण्याची सोय. जुन्या संरक्षण भिंतीवरच नवीन बांधकाम केल्यान हे बांधकाम किती दिवस टिकणार,हा प्रश्नच आहे.सुमारे आठ कोटी रूपये खर्च करून बांधलेल्या बसस्थानकात सध्या बसऐवजी दुचाकी थांबत आहेत.

बस स्थानकाच्या उद्घाटनापूर्वी दोन दिवस आधीच संरक्षण भिंत बांधून त्यावर चुना मारण्यात आला आहे. सुरुवातीपासून या बस स्थानकाच्या कामाबाबत अनेकांनी तक्रारी तसेच आंदोलने केली आहेत. हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे अनेकांचे आरोप असून सुविधा पूर्ण नसतानाही उद्घाटनाचा घाट का घातला गेला? असा प्रश्न आता प्रवासी विचारत आहेत.श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनाला तुळजापूर शहरात दररोज हजाराच्या संख्येने भाविक येत असतात. तुळजापूरला अद्यापपर्यंत रेल्वे नसल्याने बस हा एकमेव मार्ग तुळजापूरला येण्यासाठी आहे. त्यामुळे वाढत्या भाविकांची संख्या लक्षात घेता लातूर रोडवर नवीन बस स्थानकाची उभारणी करण्यात आली. शहरातील जुने बसस्थानक पाडून त्या ठिकाणी नवीन बस स्थानक उभारण्यात आले आहे. यासाठी जवळपास आठ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. सुरुवातीला या बस स्थानकासाठी ३.५० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर त्यामध्ये जवळपास ४.२५ कोटीची वाढ करण्यात आली होती.बस स्थानकाचे उद्घाटन झाल्यावर शनिवारी सोलापूर साठीच्या बसेस सोडण्यात आल्या. मात्र येथील शौचालय तसेच पिण्याच्या पाण्याची यंत्रणा बंद असलेली दिसून आली. ऐन उन्हाळ्यात प्रवाशांना या बस स्थानकात पिण्याच्या पाण्याची सोय नाही. शिवाय महिलांसाठी स्वच्छता गृहाची देखील सोय नाही.









### जुन्या संरक्षण भिंतीवरच केले नवीन बांधकाम

या बस स्थानकाच्या संरक्षण भिंती ह्या नवीन न बांधता जुन्या भिंतीवरच बांधकाम चढवण्यात आले आहे. हे बांधकाम करून त्यावर लगेचच प्लास्टर करून चुना मारण्यात आला आहे. त्यामुळे या बांधकामावर पाणी मारण्याची तसदी सुद्धा ठेकेदाराने घेतली नाही.

### बस स्थानकाच्या पाठीमागे मोकळी जागा



हे बस स्थानक बांधताना पश्चिम बाजूला बस स्थानकाच्या पाठीमागे मोकळी जागा सोडण्यात आली आहे. ही जागा नेमकी कशासाठी सोडण्यात आली याचे उत्तर कोणालाच मिळत नाही. आजच्या काळात या जागेचा भाव कोट्यावधी रुपये असून, ही जागा अशीच मोकळी सोडून का देण्यात आली असा प्रश्न आता नागरिक करत आहेत.

### कामाबाबत आंदोलने

या बस स्थानकाचे काम सुरू झाल्यानंतर अनेक सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी याबाबत निवेदन देत तसेच आंदोलन करत हे कामे निकृष्ट होत असल्याचे आरोप केले होते. मात्र याकडे साफ दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

## परंडा येथे दिव्यांग बांधवांसाठी शिबिरात २१ दिव्यांग बांधवांची केली तपासणी



आरंभ मराठी | परंडा

परंडा तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळावे त्याचबरोबर तालुक्यातील दिव्यांग बांधव प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाचे राज्यअध्यक्ष तानाजी घोडके यांच्या निवेदनानुसार परंडा येथे दिनांक २ मे २०२५ रोजी दिव्यांग तपासणी शिबिर पार पडले. यामध्ये २१ दिव्यांग बांधवांच्या तपासण्या करण्यात आल्या. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी धाराशिव उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परंडा यांच्या वतीने हा कॅम्प यशस्वी पार पाडण्यात आला.या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग , मतिमंद दिव्यांग, अंध अशा एकूण २१ दिव्यांग नागरिकांची तपासणी करण्यात आली. या तपासण्या करण्यासाठी धाराशिव येथील तज्ञ डॉक्टर डॉ. ज्योती कल्याणी, डॉ सुहास शिंदे, डॉ कृष्णा स्वामी यांनी कामकाज पाहिले. हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी दिव्यांग उद्योग समूहाचे जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, उत्तम शिंदे, शहर प्रमुख गोरख देशमाने, उपरुग्णालय एक्स रे विभाग बापू खताळ , भराटे आदीसह कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते भैरवनाथ कानडे यांचा सन्मान



आरंभ मराठी | जळकोट

धारशिव जिल्ह्यातील उमरगा येथील बांधकाम व्यावसायिक तथा सामाजिक जाणिवेचे सुप्रसिद्ध उद्योजक यशवंत वसंतराव पाटील व डॉ. उमाताई यशवंतराव पाटील या उभयतांच्या संकल्प शक्तीतून उमरगा शहराच्या वैभवात मोलाची भर टाकणाऱ्या ' ऐश्वर्या हाईट्स ' या सुसज्ज वास्तुचा शानदार सोहळा राज्याचे ग्रामीण विकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते तर महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाचे माजी सचिव व्यंकटराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी निवेदक तथा सहशिक्षक भैरवनाथ कानडे यांना महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तसेच समग्र शिक्षा आणि पीएमश्री अंतर्गत ग्रंथालय उपक्रम सन २०२४ – २५ साठी 'राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,पुणे ' मार्फत त्यांच्या पुस्तकाची राज्यस्तरावर निवड झाल्याबददल त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माजी खासदार रवींद्र गायकवाड, महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाचे माजी सचिव व्यंकटराव गायकवाड, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, व्यंकटरावजी गायकवाड, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, निवृत्त पोलीस महासंचालक विठ्ठलराव जाधव, उदयोजक यशवंत पाटील, एसबीआय बँकेचे नरसिंग मेहता आदी मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष सत्कार करण्यात आला.

## जिल्ह्यातील रस्ते कामांसाठी यंत्रधारकांना संधी १४ मे पर्यंत संपर्क साधण्याचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत विविध योजनांच्या अभिसरणातून राबविण्यात येणाऱ्या अतिक्रमीत रस्ते, पानंद रस्ते, शेत रस्ते व इतर रस्ते कामांसाठी यंत्रधारकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. ही कामे मंजूर दराने अथवा त्यापेक्षा कमी दराने करण्यास तयार असलेल्या यंत्रधारकांनी १४ मे २०२५ पर्यंत संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे. या कामांसाठी इच्छुक यंत्रधारकांनी कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, तुळजापूर वळण रस्ता, नवीन सिंचन भवन, धाराशिव या कार्यालयाशी संपर्क साधावा. ही संधी जिल्ह्यातील रस्ते विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची असून, स्थानिक विकासाला चालना मिळविणारी ठरणार आहे.


## धाराशिव प्रशालेत महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण




आरंभ मराठी | धाराशिव

येथील जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती संचलित धाराशिव प्रशालेत महाराष्ट्र दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक विद्या मंदिराचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक अरुण माडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिव दिलीपराव गणेश, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक भास्करराव नायगावकर, सुरेश धारुरकर, सहसचिव ॲड सुग्रीव नेरे, प्रदीप गणेश, बालाजी जाधव, इंद्रजीत काळुंके आदी उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्तीनिमित्त मुख्याध्यापक माडेकर यांचा संस्थेच्यावतीने सहपरिवाराचा यथोचित सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक मुख्याध्यापक पंडित जाधव यांनी तर सूत्रसंचालन शिक्षक रमण जाधव यांनी व उपस्थितांचे आभार शिक्षक चंद्रकांत माळी यांनी मानले. यावेळी इयत्ता पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या गुण पत्रकांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास दोन्ही प्रशालेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलांच्या पुढाकारातून भीमजयंती उत्स्फूर्त वातावरणात साजरी



धाराशिव– भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती शिंगोली येथे अत्यंत आनंदी, उत्साही आणि शिस्तबद्ध वातावरणात मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. यावर्षी या जयंतीचे विशेष आकर्षण म्हणजे महिलांनी पुढाकार घेत संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले.भीम जयंतीच्या मिरवणुकीत डीजेऐवजी पारंपरिक बॅन्जो पार्टीच्या ढोल–ताशांच्या गजरात भीमसैनिक व भीम कन्यांनी ठेका धरत सहभाग नोंदवला. यावेळी तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव व तुपाचे बोरगाव येथील लेझीम पथकांनीही सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली.या वैचारिक आणि सुसंस्कृत सोहळ्याचे नेतृत्व सिंधू लोंढे (अध्यक्ष), कांचन वाघमारे (उपाध्यक्ष) कांचन नाना वाघमारे (कार्याध्यक्ष), सुकशाला वाघमारे (सचिव), अर्चना तुपरे (कोषाध्यक्ष), ज्योती वाघमारे (मार्गदर्शक) व शीला गायकवाड (मिरवणूक प्रमुख) यांनी समर्थपणे सांभाळले. या यशस्वी आयोजनाबद्दल धाराशिव जिल्ह्यातून महिलांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.या कार्यक्रमाचे नियोजन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा युवा संघटक बाबा वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली मोहन, सचिन, सुहास, दीपक, बबलू, अजय, मनेश वाघमारे या कार्यकर्त्यांनी केले.या वेळी उपस्थित समर्थ सिटी डेव्हलपर्सचे युवा उद्योजक सचिन शिंदे युवा नेते राहुल शिंदे व गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## साकत येथील अमोल ओव्हाळ यांचा मुक्ताई संस्थेच्या वतीने सत्कार

बार्शी– तालुक्यातील साकत येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी अमोल ओहोळ यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल मुक्ताई बहुउद्देशीय सामाजिक संस्था धाराशीच्या वतीने त्यांचा फेटा हार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी मुक्ताई संस्थेच्या अध्यक्ष सोमनाथ गायकवाड, गुणवंत सोनवणे, संग्राम बनसोडे ,उदयराज बनसोडे, मुकेश मोठे, बंटी ढवळे इत्यादी उपस्थित होते.

## जिल्हा शिक्षक व सुंदर शाळा पुरस्कारांचे पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते वितरण



आरंभ मराठी | धाराशिव

आई–वडिलांनंतरचे स्थान हे शिक्षकांचे असते. गुरुला आदर्श मानूनच आपली वाटचाल सुरू असते. विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षक करतात. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपली बुद्धिमत्ता सिद्ध करून आपले नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवावे. असे प्रतिपादन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. १ मे रोजी धाराशिव येथे शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित शिक्षक पुरस्कार व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्काराचे वितरण पालकमंत्री श्री.सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते.खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,आमदार कैलास पाटील,आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) अशोक पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार सुवर्ण शिनगारे शेलगाव ता. कळंब,श्रीराम माळी ताकविकी ता. धाराशिव,सुनंदा निर्मळे बेलवाडी ता. लोहारा,अमिन मुलानी वारूळ ता. तुळजापूर,लक्ष्मीकांत पटणे कंटेकुर ता.उमरगा, मुकुंद मदने गोलेगाव ता. वाशी,संतोष तोडकरी गणेगाव ता. भुम,प्रदीप खराडे टाकळी ता.परांडा बेबी बागवान ढोकी ता.धाराशिव, दीपक सोनवणे तुळजापूर,शंकर सावंत दहिफळ कळंब,शहाजी पुरी कसबे तळवडे ता.धाराशिव,कल्याणी तांबे रोहकल ता.परांडा ,शिवदास भागवत,अनदुर ता.तुळजापूर. पुष्पलता पांढरे जगदंबानगर ता. उमरगा,परमेश्वर भोसले करजगाव ता.लोहारा,धनंजय राऊत वाशी, अनिल क्षीरसागर ईटकुर ता.कळंब, शशिकांत चेचे, अंधारेवस्ती ता.भुम शिवाजी पोपट,पळसप ता.धाराशिव, गौतम राठोड आरळी बु ता. तुळजापूर,विजया पारडे वाशी,हरी शेके मुरूम ता.उमरगा,विलास थोरात सोनारी ता.परंडा,उमेश खोसे जगदंबानगर कडबोरा ता.उमरगा,डॉ शिवाजी चव्हाण गोवर्धनवाडी ता. धाराशिव,विक्रम पाचंगे मानमोडी ता. तुळजापूर,बाळासाहेब चिवडे मसला खुर्द ता.तुळजापूर,सुखदेव भालेकर चव्हाणवाडी ता.तुळजापूर,बळीराम घोरवाडे तांडा मुळज,ता.उमरगा, रामकृष्ण पाटील जेवळी ता.लोहारा आणि मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा प्राथमिक शाळा भाटशिरपुरा, ता.कळंब,तुळजाभवानी सैनिकी विद्यालय, तुळजापूर,जि.प.शाळा एकुर्गा ता.उमरगा,जि.प.शाळा विठ्ठलवाडी ता.तुळजापूर,जि.प.शाळा विठ्ठलवाडी ता.धाराशिव श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव,रवींद्र हायस्कूल भूम, जयराम विद्यालय नारायणवाडी, श्रीपतराव भोसले हायस्कूल,धाराशिव प्रशाला इट ता.भूम,जि.प.शाळा खोताचीवाडी ता.तुळजापूर,प्रशाला उमरगा,प्रशाला कार्ला ता.परांडा शिवशक्ती विद्यालय एकुरगा ता. उमरगा,निवासी अपंग विद्यालय सास्तुर ता.लोहारा,माणिकबाबा विद्यालय शेलगाव ता.परांडा यांच्यासह माझी शाळा सुंदर शाळा, उत्कृष्ट शाळा तसेच माझा वर्ग माझी जबाबदारी या क्षेत्रातून निवड केलेल्या मुख्याध्यापकांना व शिक्षकांना देखील सन्मानित करण्यात आले.

## तुळजापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात विविध अभियान व कार्यशाळा उत्साहात

आरंभ मराठी | तुळजापूर

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसीय कृती आराखड्यानुसार बाजार समिती परिसरात एक दिवसीय हेल्थ चेकअप कॅम्प, स्वच्छता मोहीम व शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्न वाढीसाठी एक दिवसीय कार्यशाळा व शेतमाल विक्रीसाठी जनजागृती इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. मंगळवारी (दि.२९) हे कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यात आले. सुरुवातीला सकाळी एक दिवसीय आरोग्य शिबिर कॅम्पला उपजिल्हा रुग्णालय येथील डॉ. वडणे, डॉ. करंजकर दिपाली, जगदाळे तुषार दूधभाते यांची टीम उपस्थित होती. त्यानंतर बाजार समिती आवारातील आडते, खरीदार, हमाल बाजार समितीचे कर्मचारी, शेतकरी बांधव यांनी याचा लाभ घेतला. बाजार समिती अंतर्गत बाजार समिती आवारातील रस्ते गोदाम कार्यालय इत्यादी ठिकाणची साफसफाई करण्यात येऊन जमा झालेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली .तसेच कृषी विज्ञान केंद्र तुळजापूर यांच्यातर्फे शास्त्रज्ञ डॉ. अरबाड व शाम शिंदे यांनी बाजार समिती आवारातील शेतकरी, बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक इत्यादीसाठी शेतकऱ्यांची शेती उत्पादन वाढीसाठी एक दिवसीय कार्यशाळा शेतमाल विक्री बाबत जनजागृती करणे हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तुळजापूर, मा. नगराध्यक्ष सचिन रोचकरी, बाजार समिती सभापती आशिष सोनटक्के, उपसभापती



सुहास गायकवाड, माजी सभापती विजय गंगणे, सचिन पाटील, संतोष कदम, बालाजी रोचकरी, दत्तात्रय वाघमारे, तुळजापूर भाजपा तालुकाध्यक्ष आनंद कंदले, बाजार समिती सचिव उमेश भोपळे, बाजार समितीचे कर्मचारी, अडते, व्यापारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संतोष तोडकरी यांना जिल्हा पुरस्कार प्रदान

भूम– तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेगाव येथील प्राथमिक शिक्षक संतोष दादाराव तोडकरी यांना जिल्हा परिषद धाराशिवच्या वतीने दिला जाणारा २०२३– २४ चा जिल्हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. धाराशिव येथील स्वयंवर मंगल कार्यालयात झालेल्या पुरस्कार वितरण प्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती सुधा साळुंके तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# जिल्हा युवा पुरस्काराचे वितरण, पालकमंत्र्यांकडून कौतुकाची थाप

**आरंभ मराठी | धाराशिव**

जिल्ह्यातील समाजहितासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांचा गौरव करत सन २०२३ –२४ आणि सन २०२४ –२५ चे जिल्हा युवा पुरस्कार वितरीत करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिवसाच्या औचित्याने संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या शुभहस्ते व जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी जिल्हाधिकारी शोभा जाधव तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.



पुरस्काराच्या स्वरूपात युवक व युवतीस गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम १० हजार रुपये तर संस्थेस गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम ५० हजार रुपये प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गणेश पवार, भैरवनाथ नाईकवाडी, कैलास लटके, अक्षय बिरादार, डॉ.शुभांगी रोकडे, डिंपल ठाकरे, विश्वास खंदारे, सुरेश वालवडकर, सुनील घोगरे, जान्हवी पेठे, किशोर भोकरे, सुरेश कळमकर व व्यंकटेश दंडे यांनी मोलाचे योगदान दिले.

**२०२३–२४ चे पुरस्कारार्थी**

युवक : गणेश विक्रम मुळे (मुळेवाडी,ता. धाराशिव)

युवती : डॉ. गौरी विजय बागल (तांबरी विभाग,धाराशिव)

नोंदणीकृत संस्था : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सामाजिक संस्था,सारोळा (बु)

**२०२४–२५ चे पुरस्कारार्थी**

युवक: विकास शंकर लोभे (कानेगाव,ता. लोहारा)

युवती : श्रीमती अस्मिता रमेश शिंदे (शिंगोली,धाराशिव)

नोंदणीकृत संस्था : श्रीराम बहुउद्देशीय सामाजिक संस्था, गोजवाडा (ता. वाशी)

# पालकमंत्र्याच्या हस्ते भाटशिरपूरा जिल्हा परिषद शाळेचा गौरव

**आरंभ मराठी | धाराशिव**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपूरा या शाळेने विभागात सलग दोन वेळेस प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल जिल्हापरिषद शिक्षण विभाग धाराशिवच्या वतीने राज्याचे परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते शाळेचा गौरव करण्यात आला. गुरुवारी (दि.१) स्वयंवर मंगल कार्यालय धाराशिव येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार कैलास घाडगे–पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, शिक्षणाधिकारी अशोक पाटील, शिक्षणाधिकारी (मा ) श्रीम. सुधा साळुंके, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जाटणूरे, शिवसेना जिल्हा संघटक सुधीर पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, विस्तारक नितीन लांडगे, जेष्ठ अधिव्याख्याता सुचित्रा जाधव, उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे उपस्थित होते. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण



विभागाच्या वतीने २०२३–२०२४ व २०२४–२०२५ या शैक्षणिक वर्षात माझी शाळा सुंदर शाळा ही स्पर्धा संपूर्ण राज्यात घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपूरा ता. कळंब या शाळेने केंद्र, तालुका, जिल्हा व विभागस्तरावर सलग दोन वेळा प्रथम क्रमांक मिळवला व राज्य शासनाचे २१ लाख रुपयाचे पारितोषिक मिळवले या बद्दल गौरव करण्यात आला. हा गौरव शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, अमोल बाभले, शहाजी बनसोडे, सचिन तामाने, श्रीकांत तांबारे, राजाभाऊ शिंदे, लिंबराज सुरवसे, प्रमोदींनी होळे, रंजना थोरात यांनी स्वीकारला.

# तुळजापूर येथे २५ मे रोजी मराठा वधू-वर मेळाव्याचे आयोजन, तयारी सुरू

**संयोजन समितीची बैठक**

**आरंभ मराठी | तुळजापूर**

नुकताच सकल मराठा समाजाच्या वतीने १३ एप्रिल रोजी धाराशिव शहरात राज्यस्तरीय मराठा वधु वर मेळावा पार पडला. या मेळाव्याच्या माध्यमातून अनेक विवाह जुळून आले. त्यापाठोपाठ सकल मराठा समाजाच्या वतीने तुळजापूर येथे मंगळवार दिनांक २५ मे रोजी शहरातील नळदुर्ग रोडवरील गणेश पुजारी यांच्या श्रीनाथ मंगल कार्यालयात मोफत मराठा वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याच्या नियोजनासाठी शुक्रवारी (दि.२) सायंकाळी संयोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत तुळजापूर तालुक्यात व परिसरात मेळाव्याची माहिती देण्यासाठी पोस्टर बॅनर लावणे व विवाहेच्छूकांना तसेच पालकांना वधु–वर परिचय मेळाव्यास जास्तीत जास्त संख्येने येण्यासाठी आवाहन करणे, अशा विविध विषयावर चर्चा करण्यात आली. या मेळाव्यासाठी कोणतेही शुल्क नाही. हा मेळावा मंगळवार दिनांक २५ मे रोजी सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत श्रीनाथ मंगल कार्यालयात होणार आहे. तरी जास्तीत जास्त वधु वर पालकांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक प्रा.अभिमान हंगरगेकर, अशोक गायकवाड, गणेश पुजारी, अमोल निंबाळकर, कृष्णा रोचकरी,उमाजी गायकवाड, उत्तमराव अमृतराव, सुहास साळुंके, अर्जुन जाधव, प्रा.राजेंद्र घाडगे,अशोक ठोंबळ, ॲड.रमेश भोसले, विश्वास मोटे, अशोक चव्हाण, नागनाथ वाघ, दत्तात्रय तेलंग–कदम, चंद्रशेन देशमुख, हनुमंत भालेकर, अभिजीत जाधव, नवनाथ पवार, रमाकांत लोंढे, बिबीशन मोरे, गोरोबा लोंढे,राजेंद्र कदम, चंद्रकांत भांजी, राजीव तांबे, विजय पवार, अण्णासाहेब कदम, राहुल जाधव या संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.





या मेळाव्यासाठी येताना वधू– वरांनी सोबत दोन फोटो, दोन प्रतीमध्ये बायोडाटा घेऊन पालकांसह मेळाव्यास यायचे आहे. अधिक माहितीसाठी अशोक गायकवाड ९३०७०५५३६२, प्रा. अभिमान हंगरगेकर ९४२१३५४५३८, उमाजी गायकवाड ९९२३००५२३६, अमोल निंबाळकर ९६५७६८४६४८ यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सतीश पाटील यांना उत्कृष्ट उपअभियंता पुरस्कार



**आरंभ मराठी | धाराशिव**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभाग, गोदावरी खोरे विकास महामंडळ व कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या वतीने दिनांक १५ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान घेण्यात आलेल्या व्यवस्थापन कृती पंधरवडा कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाचा उत्कृष्ट उपविभागीय अभियंता पुरस्कार इंजि.सतीश शिवाजीराव पाटील यांना प्रदान करण्यात आला. केंद्रीय जल संसाधन मंत्री सी आर पाटील व राधाकृष्ण विखे पाटील मंत्री जलसंपदा कृष्णा खोरे व गोदावरी खोरे महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दिनांक २ मे २०२५ रोजी प्रवरानगर जिल्हा अहिल्यानगर येथे सतीश पाटील यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल सतीश पाटील यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# दूध भेसळ रोखण्यासाठी जिल्हास्तरीय समिती सक्रीय

**आरंभ मराठी | धाराशिव**

दूध भेसळीचे प्रमाण वाढल्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी व ग्राहक यांना नुकसान सहन करावे लागत आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना रास्त दर मिळत नसल्याने त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत असून, भेसळीमुळे जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने २८ जून २०२३ रोजी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या आदेशानुसार जिल्हास्तरीय समिती गठीत केली आहे. या समितीचे अध्यक्ष अप्पर जिल्हाधिकारी असतील. तसेच अप्पर पोलीस अधीक्षक, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, उपनियंत्रक वैद्यमापन शास्त्र व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक झाली. यावेळी जिल्ह्यातील सर्व परवानाधारक दूध विक्रेते, दुकाने, स्टॉल याठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन दूध भेसळ तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी दूध भेसळीविषयी कोणतीही माहिती मिळाल्यास अन्न सुरक्षेसाठी चा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. नागरिकांना शुद्ध, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण दूध उपलब्ध व्हावे, यासाठी समिती कठोर पावले उचलणार आहे.

# नळदुर्ग येथील अंजनी प्रशालेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**आरंभ मराठी | नळदुर्ग**

नळदुर्ग येथील अंजनी प्रशालेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा शनिवारी (दि.३) अंबाबाई मंदिर सभागृह येथे उत्साहात संपन्न झाला.सन २००३–०४ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी तब्बल वीस वर्षांनी एकत्र जमले. यावेळी सर्वांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत सध्याची सुरू असलेली वाटचाल याबाबत सविस्तर चर्चा केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाचालक सुभद्राताई मुळे, प्रमुख पाहुणे निवृत्त मुख्याध्यापक प्रदीप कदम, जितेंद्र मोरखंडीकर, राजा शिंदे, उषा आवटे, विद्या ठोकळ, दीपक मुलगे, दोलतराव खाटमोडे, श्री देवकते, बाळासाहेब रणशूर हे होते.



यावेळी २००३–०४ बॅच चे संदीप सावंत, अशोक चव्हाण, शिवाजी सुरवसे, अमित सुरवसे, नागेश कुलकर्णी, मयूर जोशी, रविकांत महाबोले, सत्यजित कदम, शिव्या स्वामी, तात्या जाधव, दयानंद सोलापूरे, महेश जाधव, शिवानंद राठोड, प्रदीप माने, वैभव चौधरी, मनोज पाटील, संजय फरताळे, शिल्पा येडगे, अंजली जाधव, ज्योती चव्हाण, अनिता भोसले, राधाबाई घुगे, सुनिता सावंत, पूजा हत्ते, संगीता शेंडगे, राहुल क्षिरसागर, रेखा दस, ज्योती कलशेट्टी, सुनिता दळवे, दत्तात्रय चौरे, विनायक धर्मशाले, अरुणा शिंदे, मनिषा खबुले, किरण वर्हाडे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवानंद राठोड, सूत्रसंचालन संदीप सावंत तर आभार शिवाजी सुर्वे यांनी मानले.

# धनिष्का गायकवाड हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश


**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव येथील साईराम नगर येथील रहिवासी, सामाजिक कार्यकर्ते व धाराशिव सकल मराठा वधूवर सूचक समितीचे प्रमुख संयोजक अशोकराव गायकवाड यांची कन्या कु.धनिष्का अशोकराव गायकवाड हिने नुकत्याच जाहीर झालेल्या ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २२४ गुण मिळवून यश मिळवले. शिष्यवृत्तीधारक झाल्याबद्दल व अशोक चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १ मे रोजी महाराष्ट्र दिनी धाराशिव सकल मराठा वधूवर सूचक समितीकडून मान्यवरांच्या उपस्थितीत आई तुळजाभवानी देवीची प्रतिमा, शाल व बुके देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी कु धनिष्काचे वडील अशोकराव गायकवाड, प्रा.अभिमान हंगरगेकर, माजी गट शिक्षणाधिकारी राजु तांबे, अशोक चव्हाण, प्रदीप मोकाशे, माजी पी एस आय अर्जुन जाधव, माजी मुख्याध्यापक अशोक ठोंबळ, अमोल निंबाळकर,सतीश पवार, टी पी शिनगारे, शिवेंद्र हंगरगेकर आदी उपस्थित होते



# परंडा येथे तपासणी शिबिरात २१ दिव्यांग बांधवांची तपासणी

**आरंभ मराठी | परंडा**



परंडा तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळावे त्याचबरोबर तालुक्यातील दिव्यांग बांधव प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाचे राज्यअध्यक्ष तानाजी घोडके यांच्या निवेदनानुसार परंडा येथे दिनांक २ मे २०२५ रोजी दिव्यांग तपासणी शिबिर पार पडले. यामध्ये २१ दिव्यांग बांधवांच्या तपासण्या करण्यात आल्या. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी धाराशिव उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परंडा यांच्या वतीने हा कॅम्प यशस्वी पार पाडण्यात आला.या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग , मतिमंद दिव्यांग, अंध अशा एकूण २१ दिव्यांग नागरिकांची तपासणी करण्यात आली. या तपासण्या करण्यासाठी धाराशिव येथील तज्ञ डॉक्टर डॉ. ज्योती कल्याणी, डॉ सुहास शिंदे, डॉ कृष्णा स्वामी यांनी कामकाज पाहिले. हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी दिव्यांग उद्योग समूहाचे जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, उत्तम शिंदे, शहर प्रमुख गोरख देशमाने, उपरुग्णालय एक्स रे विभाग बापू खताळ , भराटे आदीसह कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# परांडा अतिक्रमण प्रकरणात उच्च न्यायालयाचा ३६ मालमत्ताधारकांना दिलासा; कारवाईला स्थगिती

**आरंभ मराठी | परंडा**

**उर्वरित जागा मालकांच्या डोक्यावर कारवाईची टांगती तलवार अद्याप कायम**

परांडा शहरातील किल्ला परिसरातील १४९ जागा मालकांच्या मालमत्तांवर पुरातत्व विभागामार्फत कारवाई करण्याच्या हालचालींना मुंबई उच्च न्यायालयात (औरंगाबाद खंडपीठ) झालेल्या तातडीच्या सुनावणीत स्थगिती दिली आहे. ॲड. महारुद्र जाधव आणि ॲड. अनु रुद्र जाधव यांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी घेत न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण दिलासा दिला. ज्यामुळे तूर्तास ३६ मालमत्ता धारकांवरील बेघर होण्याची टांगती तलवार दूर झाली आहे.परांडा शहरातील १४९ जागा मालकांच्या जमिनी पुरातत्व विभागाच्या अखत्यारित आणण्याची योजना आखण्यात आली होती. या अनुषंगाने २१, २२ आणि २४ मे रोजी शासकीय यंत्रणेने परांडा नगरपालिकेला पत्रव्यवहार करून, संबंधित मालमत्तांवरील अतिक्रमण ४ जून २०२५ पर्यंत स्वतःहून काढून घेण्याचे आदेश दिले होते. या आदेशामुळे अनेक वर्षांपासून तेथे राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.



या या हे

**इतर मालमत्ता धारकांचे काय?**

स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे की, उच्च न्यायालयाने दिलेला हा दिलासा केवळ न्यायालयात याचिका दाखल केलेल्या ३६ मालमत्ता धारकांनाच लागू आहे की उर्वरित सर्वांना लागू आहे. उर्वरित जागा मालकांच्या डोक्यावर कारवाईची टांगती तलवार अद्याप कायम असल्याचे बोलले जात आहे.



**तातडीची न्यायालयीन लढाई**

शासनाच्या या आदेशाविरोधात इलियास भाई उर्फ राजू डोंगरे, फारुख शेख, मैनुद्दीन शेख यांच्यासह एकूण ३६ मालमत्ता धारकांनी तातडीने न्यायालयात धाव घेतली. ॲड. महारुद्र जाधव व ॲड. अनु रुद्र जाधव यांनी २९ मे रोजी रातोरात तीन स्वतंत्र याचिका (पहिल्या याचिकेत १८, दुसऱ्यात ५ व तिसऱ्यात १३ मालमत्ताधारक) तयार करून उच्च न्यायालयात दाखल केल्या. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीच्या विषयाखाली सुनावणी घेण्याची विनंती न्यायालयाला करण्यात आली, जी मान्य झाली.

# मुख्याध्यापक पवार यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**आरंभ मराठी | पळसप**

जिल्हा परिषद प्रशाला पळसप येथील कार्यरत असणारे माध्यमिक शिक्षक पोपट पवार यांचा महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळीखासदार ओम प्रकाशराजे निंबाळकर, आमदार कैलास घाडगे पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, शिक्षणाधिकारी अशोक पाटील , शिक्षणाधिकारी श्रीमती सुधा साळुंखे यांची उपस्थिती होती. यावेळी पोपट पवार यांना जिल्हा



आदर्श शिक्षक पुरस्काराने सपत्नीक सन्मानित करण्यात आले. याबद्दल शालेय समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सरडे ,उपाध्यक्ष दयानंद लाकाळ, सर्व सदस्य सरपंच सिद्धेश्वर काळे, उपसरपंच राम लाकाळ, सर्व गावकरी ,शाळेतील सर्व शिक्षक खडबडे सर , बिडवे सर, हिंगे सर, कोळी सर, लाकाळ सर, शेख सर, श्रीमती क्षीरसागर मॅडम आदींनी या पुरस्कारा बदल अभिनंदन केले.

# जिल्ह्यातील रस्ते कामांसाठी यंत्रधारकांना संधी

**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत विविध योजनांच्या अभिसरणातून राबविण्यात येणाऱ्या अतिक्रमीत रस्ते, पानंद रस्ते, शेत रस्ते व इतर रस्ते कामांसाठी यंत्रधारकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. ही कामे मंजूर दराने अथवा त्यापेक्षा कमी दराने करण्यास तयार असलेल्या यंत्रधारकांनी १४ मे २०२५ पर्यंत संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे. या कामांसाठी इच्छुक यंत्रधारकांनी कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, तुळजापूर वळण रस्ता, नवीन सिंचन भवन, धाराशिव या कार्यालयाशी संपर्क साधावा. ही संधी जिल्ह्यातील रस्ते विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची असून, स्थानिक विकासाला चालना मिळविणारी ठरणार आहे.